**आरंभ**

**शपथेवर वादीचे साक्षीदार क्र.२ श्री. आनंदीप्रसाद कृष्णदुलारे यांचा सरतपास वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस. एम. पांडे यांच्या मार्फत :**

७. मी माझे सरतपासणीचे शपथपत्र दाखल केलेले आहे. आता मला ते शपथपत्र दाखविले. त्या शपथ पत्रातील मजकुर मला वाचुन व समजावुन सांगण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

८. आता मला दिनांक १९.०७.२०१० चा करारनाम्याचा दस्त दाखविला. त्यावर माझी साक्षीदार म्हणुन सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याला पुर्वीच नि.क्र.३१ देण्यात आलेला आहे. तसेच मला दिनांक १९.०७.२०१० चा दुसरा करारनामा दाखविला त्यावर माझी साक्षीदार म्हणुन सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याला पुर्वीच नि.क्र.३१ देण्यात आलेला आहे

**प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे ॲड. श्री. एम. सी. खंगारे यांच्या तोडी विनंतीवरून उलट तपास पुढे ढकलण्यात आला.**

सावनेर
दिनांक : २१.११.२०२३

समक्ष
श्रवणोत्तर स्वीकृत

(एस.ए.सरदार)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, सावनेर
तालुका सावनेर, जिल्हा - नागपूर

**आरंभ**

**शपथेवर उलट तपास प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे ॲड. श्री एम. सी. खंगारे यांच्या मार्फत :**

९. माझे शिक्षण ८वी पर्यंत झालेले आहे. मी नांदाकुर्डी येथे मागील ७-८ महिन्यापासुन वास्तव्यास आहे. यापुर्वी मी चणकापुर येथील डब्ल्यु. सी. एल. चे

क्वॉर्टर मध्ये राहत होतो. मी डिसेंबर २०२१ ला सेवानिवृत्त झालो. हे म्हणणे खरे आहे की, मी व वादी आम्ही दोघेही डब्ल्यु. सी. एल. मध्ये नोकरीस होतो. हे म्हणणे खरे नाही की, वादी हा माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही एकत्र काम करीत असल्याने त्यांची माझी चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वादीचे घरी नेहमी येणेजाणे होते.

१०. मी दावा मिळकतीची चतु:सिमा सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी व त्याच्या वडीलांना वादीचे घरी येता-जातांना पाहिले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, त्यांना मी दोन-तीन वेळा पाहिले आहे. कोण्या तारखेला जातांना पाहिले ती तारीख मला सांगता येणार नाही. वादी हे सन २०२० मध्ये सेवानिवृत्त झाले. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीचे घरी कधीही गेलो नाही. पांडुरंग नागो शेलार हे शिल्लेवाडा वस्तीमध्ये राहतात. हे म्हणणे खरे नाही की, १९.०७.२०१० चे करारनाम्यावर प्रतिवादीच्या सहया व अंगठे नाहीत व सदरचा दस्त वादीने खोटा तयार केला. सन २०१० मध्ये सावनेर येथे नोटरी होते किंवा नव्हते याची मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, नोटीरीच्या वेळेस नागपूर येथे मी व काशीराम दोघेच जण सोबत होतो व इतर कुणीही सोबत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, करारनामा नि.क्र.३१ व ३२ हे मी व काशीरामने खोटे तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, वादीने प्रतिवादींना करारनाम्याप्रमाणे रक्कम दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी हा माझा मित्र असुन त्याचे व माझे चांगले संबंध असल्याकारणाने त्याचे सांगण्यावरून मी प्रतिवादी विरूद्ध आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामधील मजकुर खोटा आहे.

उलट तपास संपला
फेरतपास : काहीही नाही

सावनेर
दिनांक : १२.१२.२०२३

समक्ष
श्रवणोत्तर स्वीकृत

(एस.ए.सरदार)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, सावनेर
तालुका सावनेर, जिल्हा - नागपूर

***CERTIFICATE***

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original file.

Mrs. A. J. Chichate
Stenographer(Grade-II)